गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक १०३ वा ● शुक्रवार ३० ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 103 | Date : 30/08/2024 | blow Friday |Page 4 Price 4

## मुस्लीम विवाह नोंदणी बंधनकारक, आसाममध्ये विधेयक मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

गुवाहाटीः मुस्लिमांचा विवाह तसेच तलाकबाबत नोंदणी बंधनकारक करणारे विधेयक आसाम विधानसभेत गुरुवारी संमत करण्यात आले. महसूल व आपत्ती व्यवस्थापनमंत्री जोगेन मोहन यांनी याबाबतचे विधेयक सादर केले. याबाबतच्या शंकांना मुख्यमंत्री हेमंत बिस्व सरमा यांनी उत्तर दिले.यापूर्वी काझींमार्फत जे विवाह करण्यात ज्याची नोंदणी झाली आहे ते वैध आहेत. मात्र आता जे नवे विवाह होतील ते या कायद्याच्या कक्षेत असतील असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी काझी विवाह नोंदणी करत, मात्र नव्या कायद्यात सरकारकडून ही नोंदणी होईल. या विधेयकाचा उद्देशच बालविवाह रोखणे तसेच वधू-वर पक्षाच्या संमतीखेरीज विवाहाला प्रतिबंध करणे हा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. बहुपत्नीत्व रोखणे तसेच विवाहित महिलांना त्यांचे हक्क मिळणे तसेच पतीच्या मृत्यूनंतर त्यांना संपत्तीत योग्य वाटा मिळण्याची तरतूद असल्याचे मोहन यांनी नमूद केले.

# छत्रपती शिवरायांची १०० वेळा माफी मागायला तयार, पण विरोधकांनी राजकारण करु नये..

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचं वक्तव्य चर्चेत



मुंबई : महाराष्ट्राचं अराध्य दैवत असलेल्या शिवाजी महाराजांचा सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावरचा पुतळा अवघ्या आठ महिन्यांत कोसळला. यावरुन राज्यभरात संतापाची लाट आहे. शिवभक्त संताप व्यक्त करत आहेत. तसंच विरोधकांनी सरकारवर टीका करण्याची एकही संधी सोडलेली नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान महायुती सरकारने केला असा आरोप गेल्या तीन दिवसांपासून सातत्याने होतो आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणी केलेलं वक्तव्य चर्चेत आलं आहे.

एक महत्त्वाची बैठक पार पडली. सिंधुदुर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या दुर्घटनेबाबत ही बैठक होती. घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी आणि मनाला दुःख देणारी आहे, कारण छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या महाराष्ट्राचं अराध्य दैवत आहे. नौदलाने एका चांगल्या भावनेने तो कार्यक्रम घेतला. छत्रपती शिवरायांचा पुतळा दुर्घटनाग्रस्त झाला. । पान २ वर

## सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधीः जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार दिनांक ०२ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली. या लोकशाही दिनात मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल तसेच माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली

## उद्धव ठाकरेंची मला खरंच दया येते, देवेंद्र फडणवीस यांची बोचरी टीका



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यातून विस्तवही जात नाही हे आता महाराष्ट्राला कळलं आहे. काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरेंनी एक तर तू राहशील किंवा मी राहिन असं म्हणत थेट देवेंद्र फडणवीसांना आव्हान दिलं होतं. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदेंना दिल्लीवाऱ्या कराव्या लागतात असंही वक्तव्य केलं होतं. याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी आता उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा मला घोषित करा हे सांगण्यासाठी दिल्लीला जावं लागतं असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली आहे.मी भाजपाचा राष्ट्रीय अध्यक्ष होणार या चर्चा सुरु आहेत, अशा चर्चा घडतात. काही वेळा बातम्याच चालवण्यासाठी नसतात तेव्हा अशा बातम्या दिल्या जातात. मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की माझ्या पक्षाला माझी महाराष्ट्रात आवश्यकता आहे हे माहीत आहे. मला जर पक्षाने सांगितलं की दिल्लीत यायचं तर मी दिल्लीत जाईन. नागपूरला बसायला सांगितलं तर तिथे थांबेन असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मला उद्धव ठाकरेंची । पान २ वर

## महाराष्ट्र शासनाचे ११, १६, २१ आणि २६ वर्षे मुदतीचे १ हजार ५०० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या अकरा वर्षे मुदतीच्या १ हजार ५०० कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री १६ मे २०१९ रोजीच्या अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून लिलावाने करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कार्यक्रमासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल. ३ सप्टेंबर, २०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल, तर लिलावाचे बीडस् ३ सप्टेंबर, २०२४ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान ४ सप्टेंबर, २०२४ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची । पान २ वर

## १७ कोटी रुपयांच्या २३ किलो सोन्यासह ३ आरोपी जेरबंद

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

मुंबई : मुंबई सेंट्रल येथे महसुल गुप्तवार्ता संचालनालयाने (डीआरआय) केलेल्या कारवाईत तस्करीतील सोने लपवण्यासाठी जाणाऱ्या तिघांना अटक केली आहे. आरोपींकडून २३ किलो सोने हस्तगत करण्यात आले असून त्याची किंमत सुमारे १७ कोटी रुपये आहे. गिरगाव फणसवाडी येथून मुंबई सेंट्रल येथे सोने घेऊन जात असताना आरोपींना अटक करण्यात आली. याप्रकरणी आणखी एका आरोपीचा सहभाग उघड झाला आहे.डीआरआयने सापळा रचून तिघांना घेतलं ताब्यात याप्रकरणी पायल जैन (३९), पंखुदेवी माली (३८), राजेश कुमार जैन (४३) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यातील पंखुदेवी हा भुलेश्र्वर येथील रहिवासी आहे, तर पायल व राजेश दोघेही मुंबई सेंट्रल येथील रहिवासी आहेत. राजेश व त्याचा साथीदार रमेश यांच्या सांगण्यावरून तिघेही फणसवाडी येथून सोने घेऊन मुंबई सेट्रल येथील घरी ठेवण्यासाठी घेऊन जात होते. त्याबाबतची माहिती डीआरआयला मिळाली. त्यानुसार डीआरआयने सापळा रचून तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडील बॅगेच्या झडतीत २२.८९ किलोग्रॅम तस्करी केलेले सोने सापडले. याशिवाय तस्करी केलेल्या सोन्याच्या विक्रीच्या उत्पन्नाचे ४० लाख रुपये घरात लपवले होते. ती रक्कमही हस्तगत करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या सोन्याची किंमत १६ कोटी ९१ लाख रुपये आहे. आरोपींविरोधात सीमा शुल्क कायदा, १९६२ च्या तरतुदी अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

## मतदार यादीतून चुकीने नावे वगळले असल्यास नव्याने फॉर्म ६ भरून देण्याचे आवाहन : जिल्हा निवडणूक अधिकारी

### प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी समन्वय ठेवण्यासाठी राजकीय पक्षांनी बुथ लेवल एजंटची नेमणूक करावी

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधीः मतदार यादी पुनरिक्षण कार्यकमांतर्गत ऑक्टोबर २०२३ ते जानेवारी २०२४ या दरम्यान जिल्ह्यातील १ लाख ५६ हजार ९५० मृत, दुबार तसेच स्थलांतरीत मतदारांची नावे वगळण्यात आली होती. या वगळण्यात आलेल्या मतदारांपैकी ज्या मतदारांची चुकीने वगळणी झाली आहे. अशा मतदारांचे नाव, नमुना ६ अर्ज भरून पुनश्र्चः मतदार यादीत समाविष्ट करणेची कार्यवाही मतदार केंद्रस्तरीय अधिकारी यांचेमार्फत सुरू आहे. याबाबत बीएलओ सोबत समन्वय ठेवण्यासाठी राजकीय पक्षांनी त्यांचे बुथ लेवल एजंट (BLO) नेमण्याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आवाहन केले आहे. याबाबत राजकीय पक्षांची बैठका घेऊन अशी मोहीम सुरू असून ज्या मतदारांची चुकीने नावे वगळणी झाली असेल त्यांचे नमुना ६ चे अर्ज बीएलओ यांचेकडून भरून देण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांनी बीएलओ यांची नेमणूक करून त्याची यादी जिल्हा निवडणूक कार्यालयास लवकरात लवकर सादर करावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

## राष्ट्रीय स्तरावरील ‘सर सन्मान’ या पुरस्कार करिता अमोलराजे भोसले यांचे निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज**



अक्कलकोट/प्रतिनिधीः येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त विजय उर्फ अमोलराजे भोसले यांना स्टेट इंनोव्हेशन अँड रिसर्च फॉउंडेशन महाराष्ट्र यांच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील ‘सर सन्मान’ या पुरस्कार करिता निवड करण्यात आली आहे अशी माहिती संस्थेचे राज्य समन्वयक सिद्धाराम माशाळे, बाळासाहेब वाघ व महिला राज्य समन्वयक श्रीमती हेमा शिंदे यांनी दिली. अमोलराजे भोसले यांना लोक कल्याणसाठी शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय कार्यात भरीव योगदान दिल्याबद्दल कार्याप्रती कृतज्ञता म्हणून हा पुरस्कार सन्मान पूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे वितरण दिनांक ३१ आगस्ट रोजी सकाळी १० वाजता सिंहगड इन्स्टिटयूट सोलापूर येथे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील कॉन्फरन्स मध्ये होणार आहे. सदर पुरस्कार जागतिक कीर्तीचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद नातू, महाराष्ट्र शासनाच्या सारथी संस्थेचे संचालक अशोक काकडे, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व प्रिसीजन फॉउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

## दोन महिन्यात का झाली सीईओ कुलदीप जंगम यांची बदली

**दैनिक यश सिद्धी न्यूज**



सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्हा परिषदेचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांची बुलढाण्यावरून दोन महिन्यात बदली का झाली? अशी चर्चा आता सोलापुरात सुरू झाली आहे.

जंगम यांनी बुलढाणा सोडला असून शुक्रवारी ते सोलापूर जिल्हा परिषदेचे सीईओ म्हणून पदभार घेणार आहेत.सोलापूर झेडपीचे नवनियुक्त सीईओ जंगम यांची ४ जुन २०२४ रोजी बुलढाणा जिल्हा परिषदेचे सीईओ म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी ७ जुन २०२४ ला बुलढाणा जिल्हा परिषद सीईओ पदाचा पदभार स्वीकारला होता. तीन महिन्यातच त्यांची बदली झाली आहे. तत्कालीन सीईओ भाग्यश्री विसपुते यांच्या बदलीनंतर बुलढाण्याचे भुमिपुत्र आयएस विशाल नरवाडे यांची नियुक्ती झाली होती. परंतू लोकसभा निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर पुन्हा त्यांची बदली करण्यात आली होती. त्यानंतर बी. एम. मोहन यांच्याकडे काही काळ पदभार देण्यात आला होता. ४ जुनला जिल्हा परिषद सीईओपदी कुलदीप जंगम यांची नियुक्ती झाली होती. परंतु दि. २९ ऑगस्टला त्यांची बदली सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारीपदी करण्यात आली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर स्थानिक व जिल्ह्यातील तीन वर्ष कालावधी पूर्ण झालेल्या कार्यकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. या पार्श्र्वभूमीवर शासनाने गुरुवारी सात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. त्यात बुलढाण्याचा सुपुत्र असल्याने जंगम यांची सोलापूर जिल्हा परिषदेचे सीईओ म्हणून दोन महिन्यातच बदली करण्यात आली तर सोलापूर जिल्हा परिषदेच्या सीईओ मनीषा आव्हाळे यांची जिल्ह्यात तीन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्याने पुणे स्मार्ट सिटीचे सीईओ म्हणून बदली करण्यात आली आहे.

**कोण आहेत जंगम?** कुलदीप जंगम नांदेड जिल्हा परिषदेत सहाय्यक जिल्हाधिकारी होते आणि त्यांनी सिल्लोड, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील महसूल विभागातही काम केले होते.जंगम हे २०१८ च्या नागरी सेवा परीक्षेत IPS झाले. २०१४ मध्ये त्यांनी एनआयटी सिलचरमधून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पूर्ण केले

## गोगांव तंटामुक्त समिती अध्यक्षपदी महादेव पाटील



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : मौजे गोगांव ग्रामपंचायतीचे ग्रामसभा सरपंच वनिता सुरवसे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात आले ग्रामसेवक यांनी सभेचे इतिवृत्त वाचून शासनाच्या विविध योजना व परिपत्रक वाचले यावेळी बाल संरक्षण समिती स्थापन करण्यात आले अध्यक्षाच्या परवानगीने विविध गावातील समस्या जाणून घेण्यात आले यावेळी

गोगांव तंटामुक्त समिती अध्यक्ष पदी महादेव पाटील यांचे बिन विरोध निवड करण्यात आले यावेळी सरपंच सौ वनिता सुरवसे यांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप अनिल मुलगे, शरणप्पा कलशेट्टी, कल्याणराव बिराजदार , ग्रामसेवक विक्रम घाटे , यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# संपादकीय

## समाजाच्या हिताचे नाही..

अनेक कुटुंबे न्यायालयाची पायरी चढतात. २०२१ ते २०२३ या तीन वर्षांत राज्यात दरवर्षी सुमारे ३८ हजार खटले दाखल झाले. केंद्रीय विधी व न्याय खात्याने ही आकडेवारी माध्यमात जाहीर केली आहे. हा चिंतेचा विषय आहे. अनेक कुटुंबे मिळून समाज तयार होतो. परिणामी समस्येची कारणे शोधून त्यावर उपाय योजणे ही जाणत्यांची आणि ते उपाय अमलात आणणे ही लोकांची जबाबदारी आहे. याबाबतीत जाणत्यांचे निरीक्षण काय सांगते? नव्या पिढीत संयम कमी होत आहे. स्वातंत्र्य आणि समानतेचा चुकीचा अर्थ लावला जातो असे मत नागपूर कुटुंब न्यायालयातील ज्येष्ठ वकील रेखा बारहाते व्यक्त करतात. परस्पर सामंजस्य आणि सन्मान जपला तर वाद कमी होतील, असेही त्या म्हणाल्या. या उणिवा दूर करण्याची निकड सर्वांना सारखीच जाणवण्याची गरज आहे. याचाच परिणाम समाजस्वास्थ्यावर देखील होतो. समाजात बालगुन्हेगारी वाढत आहे. अडनिड्या वयाच्या मुलांचा सामाजिक गुन्ह्यात सहभाग आढळतो. पाचवीतील मुलाने दप्तरात पिस्तूल आणले आणि मित्राला गोळी घालून ठार केल्याची घटना नुकतीच बिहारमध्ये घडली. उद्ध्वस्त होत चाललेली कुटुंबव्यवस्था हे या समस्यांचे मूळ आहे. ज्याचे भयंकर परिणाम समाज अनुभवत आहे. काळानुसार जगण्याच्या पध्दतीत बदल अपरिहार्य आहेत. संयुक्त कुटुंबपध्दती छोटी होणे हे त्याचे चपखल उदहारण. त्याचे औचित्य पटवणारी कारणेही सांगितली जाऊ शकतात. तथापि त्याचा अर्थ मूल्ये बदलणे असा होऊ शकेल का? संयुक्त कुटुंबात भावभावनांचा निचरा घरातच होऊ शकायचा. अशी घरे सर्वांसाठी मूल्यांची शाळा होते. मोठी माणसे संयम, सहनशीलता, प्रसंगी मौन पाळणे याचा पुरस्कार करायची. तर छोट्यांवर संस्कार आणि मूल्ये रुजवली जायची. मुलांचे ऐकून घेणारे हक्काचे कान घरातच होते. प्रेम, माया, आपुलकी, जिव्हाळा या भावनिक गरजांची पूर्तता आपोआपच व्हायची. चित्र फक्त छानच नसायचे. वाद, ताणतणाव आणि भांडणेही होती. तथापि ती संपवण्याचा विवेक काही जणांकडे तरी असायचा. तथापि कुटुंबे छोटी होताना या सगळ्या गोष्टींना पर्यायी व्यवस्था उभी करण्याच्या जबाबदाऱ्यांचा मात्र विसर पडला असावा का? त्याची जाणीव समाजाला सातत्याने करून देण्याची जबाबदारी जाणत्यांची आहे. कारण स्वस्थ कुटुंबातूनच उत्तम मुले म्हणजेच उत्तम माणूस घडतो. कोणत्याही कारणांवरून ती प्रक्रिया थांबणे समाजाच्या हिताचे नाही हेच आकडेवारी दर्शवते.

# बाबू बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या १०६ व्या जयंती निमित्त मंडल आयोगाच्या शिफारशी

## समर्थक, विरोधक आणि शासकांची भूमिका. या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ६२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

छत्रपती संभाजी नगर : आपण सर्वांना ज्ञात आहेच की, २५ आगष्टला बाबू बिंदेश्र्वरी प्रसाद मंडल यांची १०६ वी जयंती आहे. त्या निमित्ताने मंडल आयोगाच्या शिफारशी : समर्थक, विरोधक आणि शासकांची भूमिका. या ज्वलंत विषयावर सद्यस्थितीत विचारमंथन व्हावे म्हणून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन (-खछ- : आईना) च्या संयुक्त विद्यमाने ६२ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे २५ आगष्ट २०२४ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या जनसंपर्क कार्यालयात, छत्रपती संभाजी नगर येथे आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना समाधान इंगळे म्हणाले की, समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी आरक्षणाची अंमलबजावणी करणे आवश्यक असताना आरक्षणाची मूळ भावना समूळ नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू आहे. करिता भारताचे संविधानातील मूळ ढाच्याला धक्का न लावता निर्णय होणे अपेक्षित आहे. जेणेकरून कलम १४, १५, १६, १९ व २१ ची अंमलबजावणी करून समता स्थापित करता येईल.

याप्रसंगी धनराज गोंडाणे म्हणाले की, जिथे विषमतेचे अस्तित्व असते, तिथे परस्परांत भांडणे होतात. परिणामी संघटनेचे विभाजन होऊन गट तयार होतात. करिता प्रज्ञा, शील व करुणेच्या मार्गाने चालले पाहिजे. एड. एस. के. बोर्डे म्हणाले की, शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे. जो कुणी प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. करिता गुलामांना गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल. १९५२ च्या जालंधर च्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, मी नदिच्या प्रवाहाला रोखणारा दगड आहे. मात्र आपले नेते मातीच्या गोळ्याप्रमाणे विरघळतात. एस. एस. वानखेडे म्हणाले की, अज्ञान हेच दुःखाचे मूळ कारण आहे. व्ही. जे. कान्हेकर म्हणाले की, विचारांचे बीजारोपण करणे म्हणजे प्रबोधन होय. ज्यात सत्याला सत्य व असत्याला असत्य प्रतिपादन करणे अपेक्षित आहे. ज्ञानी व्यक्तीने आपल्या ज्ञानाचा उपयोग इतरांसाठी केला पाहिजे. परंतु टीव्ही, मोबाईल, इंटरनेटमुळे वाचन नसल्याने ज्ञान कमी होत चालले आहे. पी. आर. बामणे म्हणाले की, विघ्नसंतोषी लोकांनी मंडल आंदोलनाला कमंडलकडे वळविले ज्याचे परिणाम समाजाला भोगावे लागत आहेत. गोविंद कांबळे म्हणाले की, उत्तर भारतातील आपली माणसे आंदोलनापासून फार दूर आहेत. अमित खिल्लारे म्हणाले की, मंडलवाद्यांना कमंडल कडे वळविल्याने योगी आदित्यनाथ सारख्या व्यक्ती मुख्यमंत्री झाल्यात. एड. विलास रामटेके म्हणाले की, कलम ३४० प्रमाणे ओबीसींच्या उत्थानासाठी मागासवर्गीय आयोग स्थापन करणे आवश्यक होते. समस्या निवारणासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहात चर्चा अपेक्षित असताना तसे न झाल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २७ सप्टेंबर १९५१ ला मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. डॉ. कैलास झिने म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेतून रॅम्से मॅकडोनाल्ड यांच्या सम्मतीने जातीय निवाडा मंजूर करून आणल्याने स्वतंत्र मतदारसंघ मंजूर झाले. परंतु गांधीनी याला सक्त विरोध केल्याने पुणे करारान्वये संयुक्त मतदारसंघाचा स्विकार करावा लागला. १९३१ च्या जनगणनेनुसार आरक्षणाची अंमलबजावणी करणे संयुक्तिक नाही. बी. पी. मंडल यांना विरोध करण्यासाठी त्याच काळात बी. एन. मंडल यांचा वापर करून विरोध करण्यात आला होता. तसेच १९८० ला गरज नसताना शंकरराव चव्हाण यांच्या काळात झिरो बजेट लावण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रा. डॉ. वासुदेव मुलाटे म्हणाले की, सगळे काही संपून टाकण्याच्या मार्गावर असताना आपण चर्चा करीत आहोत. नुसती डोके मोजून समता स्थापित करता येणार नाही तर त्यांच्या डोक्यात समतेचे बीजारोपण करावे लागेल. स्मृतीशेष रामनाथ चव्हाण यांच्या 'गांवगाडा काल आणि आज' समजून घेणे आवश्यक आहे. सर्व मंचावर अध्यक्ष सर्वोच्च असतात, मात्र जिथे अध्यक्षांना रबराप्रमाणे वापरले जाते, तिथे तत्त्वांची पायमल्ली होते. बहुतांश वेळा सम्मेलन साहित्यिकांचे असते मात्र अस्तित्व उद्योगपतींचे पहायला मिळते. आरक्षण हे संरक्षण आहे.

म्हणून पारदर्शकता पाळली पाहिजे. पहिल्या मागासवर्गीय आयोगाच्या शिफारशींना स्वतः अध्यक्ष काकासाहेब कालेलकरांनी टिप्पणी लिहून नाकारणे म्हणजे सुंदर देहातील कुरूप मनाचे प्रदर्शन होय. देशात लोकशाही अस्तित्वात असली तरी आपले प्रतिनिधी कुठे आहेत? याचा शोध घेतला पाहिजे. सामाजिक भान नसलेले प्रतिनिधी काहीही करू शकत नाही. व्ही. पी. सिंग यांनी मंडल आयोगाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला याबद्दल त्यांचे आभारच मानले पाहिजे. ब्राह्मणाएवढी लवचिक जात कुठेच नाही, पण त्यांची दृष्टी वाईट आहे. सल्ले द्यायला ब्राह्मण सर्वोच्च असतात. आरक्षण हे जाती निर्मूलनासाठी आहे, भांडणे लावण्यासाठी नव्हे! म्हणून १ आगष्ट २०२४ च्या निर्णयातील चाणक्य नीती समजून घेतली पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकांचे व त्यांच्या समूहाचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रानडे, गांधी आणि जिन्ना या चर्चेत म्हणाले होते की, जेव्हा समाजातील पक्ष, संघटना, संस्था अधोगतीकडे वाटचाल करीत असतात, तेव्हा त्यांच्या कडून उपयोगात आणले जाणारे जुने विचार, जुन्या सवयी व जुने मार्ग बदलले पाहिजेत. अशा स्थितीत आपण पोहोचलो आहेत. भारताचे संविधानात संवैधानिक समूहाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण असावे अशी तरतूद करण्यात आली आहे. परिणामी एससी ला १५ टक्के तर एसटी ला साडेसात टक्के तरतूद करण्यात आली आहे. मात्र ओबीसींना तरतूद करताना आरक्षण ५० टक्क्याच्या पुढे जाऊ नये, याची दक्षता बाळगून १९९२ ला तत्कालीन प्रधानमंत्री व्ही. पी. सिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय जाहीर केला तेव्हा ५२ टक्के जनसंख्या असणाऱ्या समूहाला केवळ २७ टक्के आरक्षण लागू करण्यात आले. सोबत आर्थिक आधारावर क्रिमीलेअर लावून क्रिम काढून लेअर ठेवण्यात आली. अशी क्रिमीलेअर एक दिवस एससी, एसटीला सुद्धा लावली जाणार हे तेव्हाच ठरले होते. फक्त ते योग्य वेळेचा शोध घेत होते. त्या अनुषंगाने १ आगष्ट २०२४ ला सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, नेहरूंच्या कार्य काळात एस सी, एसटीच्या प्रगती लक्षात घेऊन ओबीसींच्या १००० जातींनी ज्यांना एससी, एसटीत समावेश करण्याची पत्राद्वारे विनंती केली होती. मात्र त्या मागणीला केराची टोपली दाखवण्यात आली. अन्यथा तेव्हाच आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्याच्या पुढे गेली असती परिणामी सर्वोच्च न्यायालयाला ५० टक्क्यांची मर्यादा लागू करता आली नसती. विधायिका, कार्यपालिका व न्यायपालिकेसह जीवनाच्या सर्व क्षेत्रात शतप्रतिशत आरक्षणाची अंमलबजावणी केली पाहिजे. जेणेकरून समाजात समता प्रस्थापित केली जाऊ शकेल. मातंगासह इतरांना ब्राह्मणवाद्यांचे षडयंत्र लक्षात येत नसल्याने ते उपवर्गीकरणाचे समर्थन करीत आहेत. आपण २० लाख लोकसंख्येच्या शहरातून किमान २०० लोक शोधून काढले पाहिजे, ज्यांच्या बळावर आंदोलन चालविले जाऊ शकेल. परिणामी प्रत्येक वार्डात एखादी तरी व्यक्ती फुले शाहू आंबेडकराईट म्हणून पुढे येऊ शकेल. ज्यांच्या साठी मंडल आयोगाची नियुक्ती करण्यात आली होती, त्यांनाच याची जाणीव नसल्याने, त्यांना कमंडल कडे वळविण्यात प्रस्थापित यशस्वी झाले आहेत.

या मंडल आयोगात चेअरमन बी. पी. मंडलसह आर. आर. भोळे, देवान मोहनलाल, एल. आर. नाईक, के. सुब्रमण्यम व एस. एस. गिल हे सदस्य होते. हा अहवाल दोन खंडात विभागला असून पहिल्या खंडात १४ प्रकरणे व दुसऱ्या खंडात २१ परिशिष्टये आहेत. ज्यात सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या समूहाची वास्तविक स्थिती स्पष्ट केली आहे. याची जाणीव संबंधितांना करून द्यावी लागेल. करिता आपण आज बाबू बिंदेश्र्वरी प्रसाद मंडल यांच्या जयंतीनिमित्त मंडल आयोगाच्या शिफारशीवर समर्थक, विरोधक व शासकांची भूमिकेविषयी जनतेला संदेश देण्यासाठी या महत्वपूर्ण ज्वलंत विषयावर चर्चा करीत आहोत.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन एड. विलास रामटेके यांनी केले. या कार्यशाळेला धनराज गोंडाणे, दिलीप मेश्राम, अमित खिल्लारे, डॉ. कैलास झिने, एड. एस. के. बोर्डे, एस. एस. वानखेडे, अरुण इंगळे, डब्ल्यू. बी. तायडे, बी. जे. कान्हेकर, पी. आर. बामणे, गोविंद कांबळे, विराज कांबळे, समाधान इंगळे, साधू आनंद, भाष्कर मेश्राम, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

पान १ वरुन

## महाराष्ट्र शासनाचे ११, १६, २१ आणि

कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.कर्जरोख्याचा कालावधी ११ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ४ सप्टेंबर, २०२४ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक ४ सप्टेंबर, २०३५ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल. व्याजाचा दर लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरील दरसाल दर शेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान प्रतिवर्षी मार्च ४ आणि सप्टेंबर ४ रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (डङठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री–खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

## छत्रपती शिवरायांची १०० वेळा..

या संदर्भात जी बैठक पार पडली त्या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नौदलाचे अधिकारी होते. असं एकनाथ शिंदेंनी सांगितलं.

आपण दोन संयुक्त समिती नेमल्या आहेत. एक समिती पुतळा दुर्घटनाग्रस्त कसा झाला? त्याची चौकशी करणार आहे. दुसऱ्या समितीत आपले तज्ज्ञ तसंच शिल्पकार, आयआयटी, नौदल अधिकारी आहेत. लवकरात लवकर शिवाजी महाराजांचा पुतळा तिथे उभा राहिला पाहिजे त्यावर आमचं लक्ष्य आहे. त्याबाबत शिल्पकारांशी चर्चा करण्यात आली. आजही काही लोकांबरोबर बैठक गेली. मजबुतीने पुतळा उभा रहावा यासाठी आम्ही प्रयत्न करतो आहोत असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, आमची तज्ज्ञ समिती तिथलं वातावरण, वाऱ्याचा वेग, हवामान या सगळ्याचा विचार करुनच नवा पुतळा उभा करणार आहे. आता जो पुतळा उभा राहिल तो कायमस्वरुपी आणि भक्कम पुतळा असेल. असंही आश्र्वासन एकनाथ शिंदेंनी

झालेली घटना अत्यंत दुर्दैवी आहे. दुःख देणारी घटना घडली आहे. मला आता इतकंच सांगायचं आहे पण त्याचं राजकारण करणं हे त्यापेक्षा दुर्दैवी आहे. विरोधकांना अनेक विषय आहेत राजकारण करायला, छत्रपती शिवाजी महाराज ही आपली श्रद्धा आहे, अस्मिता आहे. यावर कृपा करुन राजकारण करु नये. मी माफी मागावी अशी विरोधकांची मागणी आहे तर छत्रपती शिवाजी महाराज हे माझं अराध्य दैवत आहेत त्यांच्या पायावर एकदा नाही शंभरवेळा डोकं ठेवायला तयार आहे. १०० वेळा मी त्यांची माफी मागायला तयार आहे, मला त्यात काहीही कमीपणा वाटणार नाही. कारण छत्रपती शिवरायांचा आदर्श घेऊन आम्ही राज्याचा कारभार करत आहोत. मी त्यांच्या पुतळ्यासमोर कायमच नतमस्तक होतो. विरोधकांना माझं हेच सांगणं आहे की या घटनेचं राजकारण करु नये. छत्रपती शिवाजी महाराजांचा रुबाबदार पुतळा उभा कसा राहिल यासाठी विरोधकांनी सहकार्य केलं पाहिजे. असंही एकनाथ शिंदे म्हणाले.

## उद्धव ठाकरेंची मला खरंच दया येते,

खरंच दया येते. एक काळ असा होता की हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे मातोश्रीमध्ये असत. त्यावेळी दिल्लीतले सगळे नेते मातोश्रीवर यायचे. आता उद्धव ठाकरेंना तीन दिवस दिल्लीला जाऊन बसावं लागतं. सोनिया गांधींच्या भेटीसाठी वाट बघावी लागते. सोनिया गांधींना जेव्हा भेटतात तेव्हा सोनिया गांधी फोटोही काढू देत नाहीत. फोटो न काढताच त्यांना दिल्लीहून परत यावं लागतं. त्यामुळे मला वाटतं की त्यांनी आमच्यावर बोलू नये. आम्ही राष्ट्रीय पक्ष आहोत. आम्ही दिल्लीला जातोच, देशाच्या पंतप्रधानांना भेटायला जातो. ममता बॅनर्जीही जातात, विरोधातले इतर नेतेही जातात. जर आपल्या राज्याचा विकास करायचा असेल तर केंद्रात पंतप्रधानांची भेट घ्यावीच लागते. मात्र उद्धव ठाकरे लाचारी पत्करुन सोनिया गांधींना भेटता आणि त्यांना सांगता की मला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा बनवा आणि त्या नकार देतात. मग लाचारी कोण करतंय? असा प्रश्र्न विचारुन देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर शेलक्या शब्दांत टीका केली आहे.

# शासकीय निवासी शाळा नंगपूरा–मुर्री व्हॉलीबॉल संघ विजयी

## विजयी संघ जिल्ह्यावर खेळणार : तालुकास्तरीय व्हॉलीबॉल प्रथम क्रमांक



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

गोदिंया : तालुक्यातील नंगपूरा–मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळाच्या चमुने वयोगट चौदाचे संघ तालुका व्हॉलीबॉल खेळात प्रथम क्रमांक पटकवून विजयी झाला. सदर सांघिक खेळ हे क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी अंतर्गत व्हॉलीबॉल मुले खेळ सुरू आहेत. सदर स्पर्धा ही क्रीडा अधिकारी कार्यालय येथील पटांगणावर विजयी सामना (दि.२९) दुपारी ०२.०० वाजता झाला. यामध्ये गोदिंया तालुक्यातील व्हॉलीबॉल वयोगट चौदा, सतरा व १९ असे होते. यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा–मुर्री या चमुने सहभाग घेऊन वयोगट चौदाचे तालुकास्तरीय व्हॉलीबॉल प्रथम क्रमांक विजयी झाला आहे.


यामध्ये सहभागी विद्यार्थी कार्तिक नहामुर्ते, सागर कोहरे, आदित्य कोकोडे, लखन पेंदाम, विक्रांत टेंभूर्णे, गौरव जमदाळ तसेच मार्गदर्शक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी व कार्तिक सहारे यांनी सराव करून घेतले. मुन्नाभाई नंदागवळी यांनी व्हॉलीबॉल खेळाचे नवनवीन टिप्स देत विजय प्राप्त केले. विजयाच्या यशाबद्दल सहायक आयुक्त विनोद मोहतूरे यांच्या नेतृत्वात शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांनी अभिनंदन करत शाळेचे शिक्षक प्रदिप ढवळे, नीता भलमे, साधना पारधी, अस्मिता तेलंग, स्वाती राणा, अर्चना चव्हाण तुषार महाजन आदी शाळेतील कर्मचारी व बाह्य स्त्रोत कर्मचारी यांनी अभिनंदन करुन पूढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# २८ सप्टेंबरला आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिवस साजरा करावा : स्वप्निल कांबळे

## बारामती उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले निवेदन



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

बारामती/प्रतिनिधीः माहिती अधिकार अधिनियम २००५ कायदा देशभरात २००५ सालापासून लागू आहे. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाणीवपूर्वक उचललेल्या पावलांमुळे अल्पावधीतच महाराष्ट्र राज्यात हा कायदा लक्षणीय स्वरूपात लोकाभिमुख झाला आहे. तरीदेखील नजीकच्या काळात अधिकारीवर्गाच्या उदासीनतेने आपल्या तालुक्यात दिनांक २८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन म्हणून लुप्त होत चालला आहे.

बारामती तालुक्यात माहिती अधिकार अधिनियम कायद्याच्या व्यापक प्रसिद्धीकरिता व प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकास्तरावर सर्वतोपरी उपाययोजना करण्यात याव्यात, शासन परिपत्रकानुसार दि. २८ सप्टेंबर रोजी बारामती तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन साजरा करण्यात यावा,

तसेच या दिवशी माहिती अधिकार कायद्यातील तरतुदी व कार्यपद्धतीबाबतची माहिती विविध माध्यमातून व्यापक प्रसिद्धी देऊन व विविध उपक्रम राबवून बारामती तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत व शासकीय कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचवावी; तसेच तालुक्यातील सर्व प्राथमिक शाळा, महाविद्यालय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, इतर शैक्षणिक संस्थांमध्ये माहिती अधिकार विषयावर आधारित निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चर्चासत्र, व्याख्यानमाला कार्यक्रमांचे आयोजन करावे.सर्व शासकीय कार्यालयांत बारामती तालुक्यातील माहिती अधिकार कार्यकर्ते व अशासकीय समाजसेवी संस्था, सामाजिक संस्था यांच्या मदतीने प्रत्येक कार्यालयातील माहिती अधिकार कायदा व अधिनियम २००५ चे प्रशिक्षण, चर्चासत्र, व्याख्यानमाला आयोजित करण्यात याव्यात. या सर्व मागण्यांसाठी उचित आदेश पारीत करावेत, असे निवेदन माहिती अधिकार तथा सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल कांबळे यांनी गुरुवार (दि. २९ ऑगस्ट) बारामती उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर यांना दिले आहे.

# महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेने २९ ऑगस्ट पासून संप पुकारल्याने नागरिकांचे हाल

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाने विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केले मात्र या योजनेतून नगरपरिषद संवर्ग अधिकार्यांना वगळल्याने महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेने २९ ऑगस्ट पासून संप पुकारल्याने नागरिकांचे हाल बेहाल झालेला आहे. महाराष्ट्रातील विविध विभागाच्या शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत राज्यभर २९ ऑगस्ट २०२४ पासून बेमुदत संप पुकारले होते. या



आंदोलनात नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी सामील होणार होते. काही आंदोलनकर्त्यांचा मागण्या मान्य करत महाराष्ट्र शासनाने जुनी पेन्शन योजना लागू केली. जुनी पेन्शन योजना लागू झालेल्या विविध संघटनेने आपले आंदोलन माघार घेतले.मात्र नगर परिषदेमधील २००५ नंतर सेवेत भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना २००५ सली लागू झालेली डी इ पी एस पेन्शन योजना आणि २०१५ साली लागू झालेली एनपीएस पेन्शन योजना नगरपरिषदेतील संवर्ग कर्मचारी अद्याप पर्यंत या योजना लागू झालेला नाही. म्हणून २९ ऑगस्ट २०२४ पासून महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटनेने संप पुकारले असून जोपर्यंत जुनी किंवा नवीन पेन्शन योजना तोपर्यंत आंदोलन चालू राहणार असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी एका लेखी पत्रान्वये कळवले आहे. या आंदोलनामुळे अक्कलकोट मैंदर्गी दुधनी या तिन्ही नगरपरिषदेतील कामकाज २९ ऑगस्ट २०२४ रोजी संपूर्णपणे कोळंबली होती या आंदोलनामुळे सर्वसामान्य नागरिकांचा नाहक त्रास होत आहे.

# प्रथम वर्ष इंजिनिअरिंगच्या कॅप राऊंड-३ चे ऑप्शन्स भरण्याची प्रकिया दि. ३१ ऑगस्ट पासून सुरु

## ■ स्वेरी कडून सदर फॉर्म भरण्याची मोफत सुविधा विविध ठिकाणी उपलब्ध ■

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः 'शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंग प्रवेशासाठी कॅप राऊंड-३ चे ऑप्शन्स भरण्याची प्रकिया दि. ३१ ऑगस्ट पासून सुरु होत असून स्वेरी कडून सदर फॉर्म भरण्याची मोफत सुविधा जिल्ह्यातील विविध ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. प्रवेशाच्या पहिल्या आणि दुसऱ्या फेरीमध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) ला विद्यार्थी व पालकांनी प्रचंड प्रतिसाद दिला आहे. स्वेरीतील विद्यार्थ्यांचे वार्षिक परीक्षांचे निकाल, कॅम्पस प्लेसमेंट मधून निवड होणाऱ्या विद्यार्थांची वाढती संख्या, शैक्षणिक व संशोधनाचे वातावरण, मिळालेली मानांकने, उपलब्ध सोयी-सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग या गोष्टींचा विद्यार्थी व पालकांनी प्रामुख्याने विचार केलेला दिसून येत आहे.

एकूणच 'स्वेरीत प्रवेश मिळणे ही बाब आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी गरजेची असल्याचे पालकांनी व विद्यार्थ्यांनी पूर्णपणे ओळखले आहे, हेच आधीच्या प्रवेश फेऱ्यांमधून दिसून येते.' असे प्रतिपादन पदवी अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी केले.

'शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंग प्रवेशाची तिसरी फेरी (थर्ड कॅप राऊंड) चे ऑप्शन फॉर्म भरण्याची




प्रक्रिया शनिवार, दि. ३१ ऑगस्ट पासून ते सोमवार, दि.०२ सप्टेंबर २०२४ हे तीन दिवस चालणार आहे. ज्यांना पहिल्या आणि दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळाला नाही व ज्यांनी दुसऱ्या फेरीत नॉट फ्रीझ/ बेटरमेन्ट केले आहे त्यांना या तिसऱ्या फेरीचा लाभ घेता येणार आहे.' अशी माहीती अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी दिली. सन २०२४-२५ च्या पदवी अभियांत्रिकीच्या प्रवेशाकरीता यापूर्वीच ऑनलाईन रजिस्ट्रेशन फॉर्म भरणे, भरलेले अर्ज स्विकारुन कागदपत्रांची तपासणी, पडताळणी, अर्ज निश्र्चित करणे आदी प्रक्रियानंतर ऑप्शन फॉर्म भरण्यासाठी पहिल्या व दुसऱ्या प्रवेश फेरीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मागील दोन्ही फेरीत योग्य महाविद्यालय अथवा योग्य ब्रँच मिळाली नसेल अथवा कुठेच प्रवेश मिळाला नसेल अशा विद्यार्थ्यांसाठी तिसरी फेरी ही शेवटची संधी असणार आहे. त्यामुळे योग्य महाविद्यालय व योग्य अभ्यासक्रम (विभाग) याबाबतचे पसंतीक्रम ऑनलाईन भरावे लागणार आहेत. यासाठी मागील दोन कॅप राउंड मध्ये झालेल्या चूका टाळून व कट ऑफचा पूर्णपणे अभ्यास करून कॅप राऊंड-३ चे ऑप्शन फॉर्म भरणे गरजेचे आहे. 'पालक व विद्यार्थ्यांनी महाविद्यालय निवडताना महाविद्यालयात दरवर्षी होणारे प्रवेश, विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल, कॅम्पस प्लेसमेंटची संख्या, कॅम्पस मधून मिळणारे संस्कार, शैक्षणिक वातावरण, सोयी-सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग या बाबींचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. या संदर्भात अधिक माहितीसाठी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील (९५९५९२११५४) व प्रा.उत्तम अनुसे (९१६८६५५३६५) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# महिलांनी झाडाच्या फुलाप्रमाणे जीवन जगावे इतरांनी ही आनंद घ्यावा. चेअरमन सुनेत्रा पवार

## मंगळागौरी कार्यक्रमात महाशक्ती ग्रुप प्रथम



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :पंढरपूर पावसाच्या रिमझिम सरी, हिरवागार निसर्ग, सर्वांमुळे श्रावणातील वातावरण प्रसन्नता व मांगल्ये यांनी भरलेले असते अशा दुर्मिळ वातावरणाला जोश आणि ठासून भरलेल्या उत्साहाची जोड मिळते ती मंगळागौर कार्यक्रमामुळे रुक्मिणी विद्यापीठाने पंढरीत आयोजित केलेल्या मंगळागौर खेळामध्ये विशेष सहभाग जाणवला तो म्हणजे तरुणीपासून ते साठी उलटलेल्या स्त्रियांच्या आणि तोही सारख्याच उत्साहात मंगळागौरीचे खेळ त्यातील गाणी काव्य विविध स्पर्धा विविध खेळामुळे पंढरीत मराठी संस्कृतीचा ठेवाच रुक्मिणी विद्यापीठाच्या संस्थापिका सचिवा सौ सुनेत्रा ताई पवार यांनी जपला आहे कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते कलश पूजन करून करण्यात आली

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सौ सुनेत्रा ताई पवार म्हणाले की भारतीय संस्कृतीचे जतन होण्याच्या दृष्टीने व महिला तणाव विहिरीत रहावे तर आधुनिक काळातही या खेळाचे स्थान टिकून राहावे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले असून तर ज्येष्ठ पिढी आणि युवा पिढी यांचा समन्वय साधण्याचा आमचा हा प्रयत्न असून आपली संस्कृती जोपासणीची काम महिला वर्गणी करण्याची आव्हान केले महिलांनी झाडाप्रमाणे असावे झाड कधीही विचार करत नाही मी किती फुले गमावली झाड नवीन फुले तयार करते तसे महिलांनीही आपल्या जवळचे ज्ञान संस्कार इतरांना देण्याचे सांगून संस्था सन २०१४ पासून अशा विविध कार्यक्रमातून महिला सबली सबलीकरणाची काम करत असल्याचे सांगितले

यावेळी रुपये २०००००/०० संता देणगीदार डॉक्टर वनिता घाडगे देसाई यांचा माहेरची साडी यावेळी देऊन सत्कार ही करण्यात आला.तुझं माझं व्यासपीठ या मंगळागौरीच्या खेळात सहभागी झालेल्या प्रत्येक महिला पारंपारिक देशात तर होतीलच शिवाय कार्यक्रम पाहण्यासाठी आलेल्या महिलाही पारंपारिक विषयात नऊवारीत आलेल्या होत्या व कार्यक्रमाच्या संयोजिका सौ सुप्रिया पवार यांनी केलेल्या आव्हानात आव्हानाला प्रेक्षक महिलांनी चांगला प्रतिसाद दिला.मंगळागौर स्पर्धेचे रुपये दहा हजार ते प्रथम पारितोषिक महाशक्ती ग्रुपने रुपये ७ ००० द्वितीय पारितोषिक ९ शक्ती ग्रुपने पटकावले तर आकर्षक बक्षिसाचे मानकरीस स्मार्ट सासूबाईचे वर्षा ढवळे व नथ विषयी चारोळीचे प्रति कांबळे यांनी विशेष बक्षीस मिळवली. अशा या खेळातून ऐतिहासिक आणि वर्तमान असे दोन्ही काळ अनुभवण्याची परभणी उपस्थित महिलांना व खेळाडूंना मिळाली तर डॉक्टर वनिता घाडगे देसाई दूरदर्शन निवेदिता यांच्या सूत्रसंचालन महिला प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केली मंगळागौरी स्पर्धेचे परीक्षक म्हणून ब्रह्मदेव मोरे व अँड राजेश्र्वरी केदार यांनी केली

## निफाड येथे शिवसेनेची आढावा बैठक संपन्न

# महायुतीने निफाड विधानसभेची जागा शिवसेनेला सोडावी कार्यकर्त्यांची मागणी

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :महायुतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणून महिला वर्गाला पंधराशे रुपये माहेरचा आहेर

देऊन मुख्यमंत्री मा.नामदार एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील माय भगिनींचे मने जिंकली असून अशा विविध शासकीय योजना महायुती सरकारने जनतेसाठी आणल्या असुन,शहरापासून ते ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेपर्यंत याची माहिती व्हावी, शिवसेना पक्षाचे संघटन मजबूत व्हावे या दृष्टीने आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर शिवसेनेची आढावा बैठक शासकीय विश्रामगृह निफाड येथे पार पडली असून निफाड विधानसभेची जागा महायुतीने शिवसेनेला सोडावी अशी आग्रही भूमिका कार्यकर्त्यांनी बैठकीत मांडली




शासकीय विश्रामगृह येथे शिवसेना उपनेते पक्षनिरीक्षक अजय बोरस्ते यांचे मार्गदर्शनाखाली तसेच संपर्कप्रमुख सुनील पाटील ,सह संपर्कप्रमुख राजेंद्र सोनवणे, जिल्हा अध्यक्ष भाऊलाल तांबडे, यांचे प्रमुख उपस्थितीत शिवसेना कार्यकर्त्यांची आढावा बैठक पार पडली असून याप्रसंगी आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे महायुती सरकारने शेतकऱ्यांना मोफत विज, मागेल त्याला सौर कृषी पंप, तरुणांना राज्याबरोबरच विदेशातही रोजगारांच्या संधी अशा विविध योजना राबविल्या जात असून त्या सर्वसामान्य जनतेपर्यंत ही माहिती गेली पाहिजे तसेच सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी शिवसेनेची संघटन शक्ती मजबूत करण्याचे आवाहन पक्षनिरीक्षक अजय बोरस्ते यांनी केले असून निफाड विधानसभेचे जागा महायुतीने शिवसेनेला सोडावी व निफाड तालुक्याचे शिवसेनेचे खंबीर नेतृत्व शिवसेना तालुकाप्रमुख, तथा निफाड नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे यांना उमेदवारी मिळावी अशी मागणी सहसंपर्कप्रमुख राजेंद्र सोनवणे, संपतराव व्यवहारे यांचे सह उपस्थित कार्यकर्त्यांनी केली ,

यावेळी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असून नाशिक जिल्हा उपाध्यक्षपदी ह भ प राजेंद्र महाराज थोरात तसेच जिल्हा उपसंघटक पदी.राजेंद्र सोमवंशी तर युवा सेना तालुका प्रमुख म्हणून भरत आव्हाड तसेच वाहतूक सेना तालुका अध्यक्षपदी देविदास ठाकरे यांची निवड या आढावा बैठकीत करण्यात आली,

यावेळी निफाड नगरपंचायत च्या नगराध्यक्ष डॉ. कविता धारराव, उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, महिला तालुकाध्यक्ष सोनाली पगारे, निफाड शहर प्रमुख दीपक गाजरे,तालुका उपाध्यक्ष सुनील सोनवणे ,पुंजाराम कडलक, मनोल लोढा, कैलास धारराव, शुभम वडघुले, नगरसेवक संदीप जेऊघाले ,देवदत्त कापसे, भाऊसाहेब कापसे, मोहन जाधव, नंजय सोमवंशी, ज्ञानेश्र्वर थेटे, धनंजय कुंदे, , संजय कुंदे, रफिक शेख, हेमंत धारराव, आसिफ पठाण ,राजेंद्र परदेशी, सिताराम बागडे, ज्ञानेश्र्वर कुंदे, योगेश कुंदे ,राहुल कापसे ,पंकज उगले ,अनिकेत परदेशी ज्ञानेश्र्वर साबळे ,पुंजाराम कडलक, राहुल धारराव, किरण गुरव, गणेश धारराव, राहुल गोसावी ,गोकुळ सोनवणे, सुरज कुंदे ,सौरभ ठाकरे ,अमोल पगारे ,साई टिळे, कैलास तासकर ,समाधान आघाव ,योगेश्र्वर शिंदे, वकील भाई शेख, हरीष आहेरआदी शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणीत भ्रष्टाचार करणाऱ्या वर गुन्हे दाखल करा

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

कळंब/ सुधाकर रणदिवे : सिंधुदुर्ग येथील राजकोट किल्ल्यावर महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात आला होता. याचे उद्घाटन खुद पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. इतक्या जबाबदार व्यक्तींनी उद्घाटन केलेल्या आराध्य दैवताचा पुतळा पाडणे म्हणजे महाराष्ट्राची अस्मिता ढासळने होय छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारताना कुठलीही काळजी घेतली नाही. तसेच यात भ्रष्टाचार करून स्वतःची घर भरणारा शिल्पकार आपटे, संबंधित कॉन्ट्रॅक्टर, व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर महापुरुषांची बदनामी, पुतळा उभारणी करत असताना केलेला निष्काळजीपणा, धार्मिक भावना दुखावणे, या गोष्टीच्या आधारे तात्काळ गुन्हा दाखल करून हे राज्य हा देश कायद्याच्या आधारे चालतो हे आम्हा सामान्य माणसाला दाखवून द्यावे अन्यथा लोकशाही मार्गाने दि.२९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून पोलीस स्टेशन समोर समस्त शिवप्रेमी च्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी असे निवेदन कळंब येथील सकल मराठा समाजाच्या वतीने पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन यांना देण्यात आले आहे.



# नेते भाजप सोडून शरद पवारांकडे जातायत की फडणवीस त्यांना पवारांकडे पाठवतायत

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

इंदापूर/ अतुल सोनकांबळेः १९९३ ला मुंबईमध्ये झालेल्या दंगलीनंतर राज्यात सत्तातंर होईल असंच काहीसं वातावरण होत.. त्यावेळी शरद पवार हे काँग्रेसमध्ये होते...आणि ते राज्याचे मुख्यमंत्रीदेखील होते.. त्यानानंतर १९९५ साली महाराष्ट्रात निवडणुका घोषित झाल्या... त्यावेळी हवादेखील भाजपा आणि शिवसेनेचीच सुरू होती... मात्र निवडणुकीचा निकाल हाती आला अन् त्यावेळची भाजप शिवसेनेची युती बहुमतापासून दूर राहिली... युतीने त्यावेळी १३८ जागा जिंकलेल्या होत्या... त्यावेळी युती बहुमतापासून दूर राहण्याचं सर्वात मोठं कारण होत ते म्हणजे अपक्ष आमदार... १९९५ च्या निवडणुकीत तब्बल ४५ अपक्ष आमदार निवडून आलेले होते.. आणि त्यातील बहुतांश आमदार हे शरद पवार समर्थक होते... त्यानानंतर या अपक्ष आमदारांना पवारांनी युतीला पाठिंबा द्यायला लावून या भाजप शिवसेना युतीच्या सरकारचा रिमोट मात्र त्यांनी आपल्या हातात ठेवला होता...

असं म्हणतात की या ४५ अपक्ष आमदारांना शरद पवारांनीचं काँग्रेसऐवजी अपक्ष उभा केल होत.. हा सगळा घटनाक्रम आम्ही तुम्हला आताचं का सांगतोय.. तर सध्यादेखील असंच काहीसं वातावरण राज्याच्या राजकारणात सुरुय... मात्र त्यावेळी यामागचे मास्टरमाईंड शरद पवार होते... आता यामागील चाणक्य आहेत देवेंद्र फडणवीस... विधानसभा निवडणूक जवळ येताच अचानक फडणवीसांचे विश्र्वासू लोक अचानक शरद पवारांच्या पक्षात प्रवेश करतायत... यामागे नेमकी शरद पवारांची पवारणीती आहे.. की देवेंद्र फडणवीसांची चाणक्यनीती..

परवा कोल्हापूर जिल्ह्यातील कागलमधील समरजित घाडगे यांनी अचानकपणे तुतारी हाती घेण्याचा निर्णय घेतला... तसं पाहिल्यास समरजीत सिंह घाडगे हे तसे पूर्वाश्रमीचे काँग्रेस राष्ट्रवादीचे मात्र २०१६ साली त्यांनी भाजपमध्ये फडणवीसांचं नेतृत्व स्वीकारून प्रवेश केलेला होता... मात्र अजित पवारांनी कागल विधानसभेसाठी हसन मुश्रीफांचं नाव जाहीर केलं... अन् इकडे समरजित घाडगे हे मुंबईत देवेंद्र फडणवीसांची भेट घेऊन आले.. आणि लगेचच त्यांनी जयंत पाटलांसमोर शरद पवारांची तुतारी हाती घेणार असल्याचे जाहीर केलं.. मात्र धनंजय महाडिक सोडले तर भाजपच्या कोणत्याही बड्या नेत्यांनी समरजित घाडगेंना रोखण्याचा प्रयत्न करण्यात आला नाही... त्यानंतर आता इंदापूरमधून हर्षवर्धन पाटील, मावळमधून बाळा भेगडे... माढ्यातून अभिजित पाटील तर पंढरपूरमधून माजी आमदार प्रशांत परिचारक ही फडणवीसांनी विश्र्वासू नेतेमंडळी सध्या शरद पवारांची तुतारी हातात घेणार असल्याची चर्चाय... मात्र सध्या भाजपची जी काय नेतेमंडळी



शरद पवारांकडे जातीय.. त्यांचा सामना मात्र अजित पवारांच्या राष्ट्रवादीशी होणार... त्यामुळे हे फडणवीसांचे समर्थक नेतेमंडळी शरद पवार हे आपल्याकडे घेतायत... की देवेंद्र फडणवीस मुद्दाम या नेत्यांना शरद पवारांकडे पाठवतायत अशी शंका सध्या व्यक्त होतीय... मात्र तुम्हाला प्रश्र्न पडला असेल की हे सर्व करून देवेंद्र फडणवीस यांना काय मिळणार... त्यामुळेच आम्ही तुम्हाला १९९५ सालच्या विधानसभा निवडणुकीचा किस्सा सुरुवातीला सांगितलेली होती.. की त्या निवडणुकीत कसे ४५ अपक्ष आमदार निवडून आलेले होते.. अगदी तसाच गेम देवेंद्र फडणवीस सध्या खेळण्याच्या मूडमध्ये दिसताय तोही शरद पवारांसोबत... समजा उद्या जर महायुतीची सत्ता गेलीच तर सत्तेमध्ये आपली माणसे असावी अशी तर फडणवीसांची खेळी असावी अशी शक्यता व्यक्त होतीय... आणि ही भाजप सोडून जाणारी नेतेमंडळी नेमक्या अशाच मतदारसंघात शरद पवार गटात जात आहे.. जिथे राष्ट्रवादी अजित पवारांचा उमेदवार समोर उभा असणार आहे.. त्यामुळे नुकसान तर भाजपचं नक्कीच होणार नाहीये कारण जागा वाटपाच्या सूत्रानुसार सध्या अजित पवार गटाकडे ४२ आमदार असून या ४२ आमदारांच्या जागा अजित पवार या महायुतीत स्वतःकडे ठेवणार आहेत... त्यामुळे या ४२ मतदारसंघांमध्ये भाजपकडून इच्छुक असलेल्या नेतेमंडळींना मात्र शांत बसावं लागणार होतं.. मात्र या ४२ मतदार संघातल्या नेतेमंडळींनी शरद पवारांच्या रूपाने मात्र नवीन मार्ग शोधलेला आहे.. आणि त्याला फडणवीसांचा आशीर्वाद देखील असल्याचं राजकीय वर्तुळात बोलल जातय... त्यामुळे देवेंद्र फडणवीस हे १९९५ प्रमाणे आपल्या समर्थक आमदारांना जास्तीत जास्त निवडून आणून सत्तेचा रिमोट आपल्या हातात ठेवणार... की शरद पवार आणखी नवीन काहीतरी राजकीय गेम खेळून फडणवीसांचा हा गेम प्लॅन हाणून पाडणार... हा मात्र येणारा काळच ठरवणार आहे..

## पंढरपूर मंगळवेढा विधानसभेसाठी वसंत नाना देशमुख यांची विचार विनिमय बैठक संपन्न




**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभेसाठी वसंत नाना देशमुख यांचे विचार विनिमय बैठक संपन्न या बैठकीमध्ये देशमुख बोलताना पुढे म्हणाले की सर्वसामान्य माणसाचा माणूस आहे मी मला सर्वसामान्य माणसाची ओळख व त्यासोबत राहण्याची वागण्याची व त्यांच्यासोबत काम करण्याची ही माझी वडीलधाऱ्यापासून लाभलेली सर्वसामान्य तळागाळातल्या माणसाच्या सुखदुःखामध्ये त्यांच्या अडचणीमध्ये जाण्याची भूमिका आम्हा देशमुख कुटुंबे नाही तीच परंपरा पुढे चालवीत आलो आहे त्यामुळे माझे आडनाव मी जरी देशमुख असेल तरी सामान्य सहसामान्य मधील माणूस आहे माझे आज बसंत नाना देशमुख आणि आपल्या कार्यकर्त्यांचा विचार विनिमय बॅटिंगमध्ये आपले मनोगत पंढरपूर मंगळवेढा विधानसभेच्या आगामी निवडणुकीमध्ये लोकांच्या आग्रहास्तव राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवण्याचा निर्धार मी माझ्या कार्यकर्त्यांनी केलेला आहे यासाठी पक्षाचे जेष्ठ नेते शरद पवार साहेबांनी विधानसभेसाठी इच्छुक असल्याने सांगितले आहे त्यांनी या गोष्टीला दुधाला दिलेला आहे म्हणून येत्या पंढरपूर मंगळवेढा विधानसभेच्या आगामी निवडणुकीमध्ये मी माझी उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडे मागणी केली आहे तसेच देखील वसंत नाना देशमुख यांनी आपल्या भाषणामध्ये व्यक्त केले

यावेळी विचारविनिमय बैठकीसाठी पंढरपूर येथील माजी उपनगराध्यक्ष नागेश शाखा भोसले तसेच माजी नगरसेवक मोहम्मद वस्ताद संतोष नेता याचप्रमाणे कित्येक पंचायत समितीचे सदस्य सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य मंगळवेढा तालुक्यातील मान्यवर नेते मंडळ उपस्थित होते

वसंत नाना देशमुख आपल्या भाषणामध्ये पुढे म्हणाले की आगामी विधानसभेसाठी नगरच्या का बसले देखील इच्छुक आहेत त्याचप्रमाणे राहुल शहा ह शिर्डीचे चिरंजीव हे देखील राष्ट्रवादीचे शरद पवार गटाच्या वतीने निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत आम्ही तिघे तयार आहोत आम्हा तिघापैकी कोणालाही धर्मेद्वारे मिळाली तरी आम्ही तिघे मिळून उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार आहोत अशी वही वसंत नाना देशमुख यांनी आपल्या विचार मनाने बैठकीमध्ये कार्यकर्त्यांसमोर मनोगत व्यक्त केले वसंत नाना देशमुख यांनी निमंत्रित केलेल्या या विचार विनिमय बैठकीत हजारो वर्ष संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी सर्वसामान्य कार्यकर्त्यांमधून आपण राष्ट्रवादी काँग्रेस पवार गटाचे तुतारी चिन्हाला आपली स्वीकारून या चिन्हावर निवडणूक लढवावी असे प्रमुख आणि जमलेल्या कार्यकर्त्यांनी सांगितले

## श्री खंडोबा देवाच्या सोमवती यात्रेच्या अनुषंगाने वाहतुकीत बदल

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी :पुरंदर तालुक्यातील जेजुरी येथे २ सप्टेंबर रोजी श्री खंडोबा देवाच्या सोमवती यात्रेच्या अनुषंगाने वाहतूक कोंडी होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी म्हणून वाहतुकीत बदल करण्यात आल्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत.वाहतुक कोंडी होऊ नये म्हणून २ सप्टेंबर रोजी पहाटे ५ वाजेपासून ते रात्री २४.०० वाजेपर्यंत पुणे जेजुरी-बारामती महामार्गावरील जड, अवजड व इतर वाहतूक बंद करुन अन्य पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.जेजुरी पोलीस ठाणे हद्दीत सातारा, फलटण, लोणंद, बारामती येथून पुणे येथे जाण्याकरीता जेजुरी-सासवडकडे येणारी जड, अवजड व इतर वाहतूक पूर्णपणे बंद करुन त्यावरील वाहने नीरा-मोरगाव-सुपा ते केडगाव चौफुला मार्गे सोलापूर महामार्गाने पुणे अशी वळविण्यात येत आहे. जेजुरी बेलसर फाटा मार्गावर पुण्याकडून बारामतीकडे येणारी वाहतूक पूर्णपणे बंद करुन बेलसर-कोथळे-नाझरे-सुपे-मोरगाव मार्गे बारामती, फलटण व साताराकडे जातील.




सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीत बारामती व नीरा बाजूकडून जेजुरी मार्गे पुणे बाजूकडे जाणारी वाहतूक पुर्णपणे बंद करुन ती मोरगाव-सुपा-केडगाव चौफुला मार्गे सोलापूर महामार्गाने पुण्याकडे वळविण्यात येत आहे. सासवड पोलीस ठाण्याअंतर्गत पुणे बाजूकडून जेजुरी मार्गे फलटण-सातारा बाजुकडे जाणारी जड, अवजड वाहतूक पूर्णपणे बंद करुन सासवड- नारायणपुर-कापुरहोळ मार्गे सातारा-फलटण किंवा सासवड-वीर फाटा-परिंचे-वीर-वाठार कॉलनी मार्गे लोणंद अशी वळविण्यात येत आहे. वाहतुकीस लावलेले निर्बंध २ सप्टेंबर रोजीच्या 'श्री खंडोबा देवाची सोमवती यात्रे'करीता येणाऱ्या भाविकांच्या वाहनांसाठी शिथील राहतील. नागरिकांनी वाहतुकीत केलेल्या बदलाची नोंद घेवून सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अंजनगाव येथे विद्यार्थ्यांना व वह्यांचे वाटप



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची चेअरमन अभिजीत (आबा) पाटील यांच्या वाढदिवस निमित्ताने अनेक उपक्रम राबवले जात आहेत.

माढा तालुक्यातील अंजनगाव खेलोबा येथील शाळेत शालेय विद्यार्थ्यांना व यांचे वाटप व या वाढदिवसाच्या निमित्ताने करण्यात आले.अंजनगाव खेलोबा येथील जिल्हा परिषद शाळा, श्री केलोबा विद्यालय, देवकते वस्ती, तांबोळी वस्ती, भंडार खिळा वस्ती शाळा तसेच गावातील आश्रमशाळा या ठिकाणी विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसले हास्य शाळेत वह्या मिळाल्याने चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर हास्य दिसत होते विद्यार्थी आनंदीत झाले होते

यावेळी विठ्ठल सुवरचे शेती अधिकारी नितीन पवार, निलेश जोडे, रोहित काळे, नाईक नवरे याचबरोबर गावातील दत्तात्रय पाटेकर, नागेश इंगळे, दत्ता पाटेकर, किरण पाटेकर, सागर मुसंकर, दादा नाईक, नानासाहेब वाघमोडे, लटके साहेब, तात्या लटके, रवी इंगळे इत्यादी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

## पडघा येथील दहीहंडी उत्सवात ३०० महीलांचा सन्मान



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : भिवंडी तालुक्यातील पडघा येथे एका दहीहंडी उत्सवात तिनशे महीलांचा साडी सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

श्री मीनाक्षी फांऊडेशन, अभिनव हेल्थ क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, आमदार शांताराम मोरे मानाची दहीहंडी उत्सव २०२४ चे आयोजन शिवसेना उपजिल्हाप्रमुख विष्णुदादा चंदे उपतालुकाप्रमुख योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना शाखेजवळ करण्यात आले होते. यावेळी गांव, खेडी, पाडयातील नागरिकांच्यात जाऊन उत्कृष्ठ काम करणाऱ्या ३०० आशा, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना शाल, साडी, सन्मानचिन्ह देऊन तर तालुक्यातील २५ गोविंदा पथकांना शाल सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मानाची दहीहंडी फोडण्याचा मान ओम साई पडघा या गोंविदा पथकास मिळाला

त्यांना शाल चषक व ७५ हजार ७७१ रुपये रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी शिवसेना उपनेते प्रकाश पाटील आमदार शांताराम मोरे जिल्हा परिषद आरोग्य व बांधकाम माजी सभापती वैशाली चंदे उद्योजक राहुल चंदे अभिनव पाटील, मनोहर ठाकरे, शशांक तांबोळी, संजय बिडवी अक्षय भोईर उपस्थित होते.

## मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बाबत काँगेस वतीने निवेदन

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधीःह्ममालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडला ही घटना दुर्दैवी असुन राज्य सरकारची जबाबदारी असुन देखील ते कबुल होत नाहीत ज्या ठिकाणी ही घटना घडली त्या ठिकाणी महाविकास आघाडीचे नेते जयंत पाटील व आदित्य ठाकरे गेले असता राणे पितापुत्राने जो गोधंळ घातला तो निदंजनक आहे.असे ता युवक काँग्रेसचे अध्यक्ष बाबासाहेब पाटील यांनी सागितंले

या पुतळा पडल्याचे निषेधार्थ व संबंधित ठेकेदाराची चौकशी करावी याबाबत नायब तहसीलदार पवार यांना राज्याचे माजी गृहराज्यमंत्री मा सिद्धाराम म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली युवक काँग्रेसच्या वतिने निवेदन देण्यात आले त्यावेळेस ते बोलत होते

या पुतळा बसविण्याचा कामात प्रचंड भ्रष्टाचार झाला असुन याचे नेतृत्व कराणारे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी जि.पचे माजी कृषी सभापती मल्लीकार्जुन पाटील यांनी केले




ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी ४०० वर्षापुर्वी गडकिल्ले बाधंले त्याची साधी वीटही अद्याप निघालेली नाही पण त्या राजाचा आठ महिन्यांपूर्वी मालवण येथील पुतळा पडला लोकसभा निवडणुकीच्या घाईगर्दीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उदघाटन केले त्यांनी देखील राजीनामा देऊन जनतेची माफी मागावी असे मागणी लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी केले.

याप्रसंगी जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष अरूण जाधव,मल्लिकार्जुन पाटील बाबासाहेब पाटील,सद्दाम शेरीकर,मुबारक कोरबु,इरणा धसाडे,विकास मोरे, श्रीशैल माळी,हर्षदीप गायकवाड,शिवराज पोमाजी,गजानंद जकीकोरे,बालाजी शापवाले,राहुल मोरे,निशांत कवडे,अयाज चंदनवाले,महादेव करमल,धनराज येळमेली,जब्बार बागवान,महादेव चुंगी,हमिद गिलकी,नितीश राठोड,नागनाथ कापसे,आदिसह युवक काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.